आर.सी.सी.क्रं.१५०/२०२२
<u>**नि.२४**</u>

**सरकारतर्फे सा.क. १**

मी या व्दारे सत्य प्रतिज्ञेवर निवेदन करतो की

माझे नांव : दादासाहेब कडूभाउ सोनवणे
वय : ३५ वर्षे,धंदा - शेती
राहणार : रा हिंगोणी, ता. नेवासा, जि. अहमदनगर

**<u>सरतपास सरकारतर्फे सहायक सरकारी अभियोक्ता श्रीमती एस पी औताडे यांचे मार्फत</u>** -

आरोपी हे माझे भाउ आहेत. आरोपी क्र २ ही माझी भावजय आहे. घटना दि. १९/०२/२०२२ रोजी संध्याकाळी ६ वाजेच्या सुमारास आमचे राहते घरासमोर घडली होती. त्यावेळी मी माझे घरी होतो. आरोपी क्र १ याची शेती बटाईने केलला बटाईदार गुलाब खिलारे याचे बरोबर मी पाण्यातील मोटार बाबत चौकशी करत होतो. त्यावेळी आरोपी क्र २ हीस असे वाटले की मी आरोपी क्र १ व २ यांचे विरुदध बटाईदार यास काहीतरी सांगत आहे. त्यावेळी मी आरोपी क्र. २ हीस म्हणालो मी तुमच्या बददल काहीही सांगत नाही तरीही आरोपी क्र. २ हिने मला शिवीगाळ करण्यास सरुवात केली. त्यानंतर आरोपी क्र. १ तेथे आला व त्याने त्याचे हातातील गजाने माझे डोक्यात मारले. त्यावेळी माझी पत्नी स्वाती ही भांडण सोडविण्याकरिता आली असता आरोपी क्र २ हिने माझे पत्नीस लाथाबुक्यांनी मारहाण केली व आरोपी क्र १ याने त्याचे हातातील गजाने पायावर मारहाण केली. सदर झटापटीत माझे पत्नीच्या गळयातील मंगळसुत्र गहाळ झाले. आरोपी क्र १ व २ यांनी आम्हाला जिवे मारण्याची धमकी दिली. त्यानंतर आम्ही शिंगणापूर पोलीस स्टेशन येथे गेलो. तेथे आम्ही रितसर फिर्याद नोंदविली. आता मला फिर्याद दाखविण्यात आली त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी २५** देण्यात येते. त्यानंतर मी व माझी पत्नी नेवासा ग्रामीण रुग्णलयात उपचाराकरिता आलो. तेथे मला सिटी स्कॅन करण्यासाठी नगर सिव्हील हॉस्पीटल येथे जाण्यास सांगितले. त्यानंतर आम्ही पुन्हा शिंगणापूर पोलीस स्टेशनला गेलो. घटनेच्या २ ते ३ दिवसानंतर पोलीस पंचनाम्यासाठी माझे घरी आले होते. पोलीसांना मी घ टनास्थळ दाखविले. पोलीसांनी घटनास्थळ पाहून पंचनामा केला. आरोपींनी मला ज्या गजाने मारहाण केली तो गज मला दाखविल्यास मी ओळखू शकतो. आरोपींनी मला ज्या गजाने मारहाण केली तो गज अंदाजे २ फूट लांबीचा होता. आता मला जप्त मुददेमाल पी आर नंबर १११/२०२३ हा दाखविण्यात आला. तो गज तोच आहे. त्यास **आर्टिकल अ** देण्यात येते. आज रोजी आरोपी क्र २ न्यायालयात हजर आहे.

सरतपास पूर्ण.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे ॲड पी.डी. गर्जे यांचे मार्फत -</u>**

मी आज रोजी न्यायालयात माझे मोटार सायकलने आलो. मोटार सायकलचा क्र. एम. एच. १७ यु. ७३९६ असा आहे. हे म्हणणे खरे आहे की, घटना माझे घराजवळ घडली. माझे शेतीचा गट क्र. १३४/२ आहे. माझे शेतात माझे घर आहे. आमचे नेवासा न्यायालयात दिवाणी स्वरुपाचे दावे दाखल आहेत. हे म्हणणे खरे आहे की, आमचे शेतातील घराकडे येण्यासाठी सोनई ते हिंगोणी जाणा-या रोडने यावे लागते. हे म्हणणे खरे नाही की, सोनई ते हिंगोणी जाणा-या रोडवरुन पुढे आमच्या शेताकडे जाण्यासाठी आम्हाला चारी क्र. ४ ने यावे लागते. हे म्हणणे खरे आहे की, आमचे वस्तीच्या पश्चीमेस येळवंडे यांची वस्ती आहे. हे म्हणणे खरे आहे की, आमचे विहीरी पासून येळवंडे यांची वस्ती ३०० फुटावर आहे. हे म्हणणे खरे आहे की, आमचे घराच्या उत्तरेस नानासाहेब जरे व सतिश जरे यांची घरे आहेत. गुलाब खिलारे हा ४ नंबर चारिकडे राहतात. बटाईदार गुलाब खिलारे हा मला गावात भेटला होता. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी मधे व माझे मधे विहीरीच्या पाण्यावरुन कायम वाद होत असतात. हे म्हणणे खरे नाही की, भांडणाचा आवाज ऐकून तिथे लोक जमा झाले. गुलाब खिलारे हा तिथे हजर होता. मी पोलीस स्टेशनला गेलो त्यावेळी संध्याकाळचे ९ वाजले होते. त्यावेळी पोलीसांनी माझी फिर्याद नोंदवून घेतली. शिंगणापूर पोलीस स्टेशन मधून आम्ही ९.३० वाजता निघालो. त्यावेळी माझे सोबत माझा मेव्हणा, पत्नी व ड्रायव्हर होता. हे म्हणणे खरे आहे की आम्ही सगळयांनी विचार करुन फिर्याद दाखल केली. ग्रामीण रुग्नालयात आम्ही ॲडमीट राहिलो नाही. शिंगणापूर पोलीस स्टेशन ते नेवासा ग्रामीण रुग्णालय हे अंतर २५ किमी आहे.

मध्यांनामुळे प्रकरण दुपार सत्रापर्यंत तहकुब

श्रवणोत्तर स्विकृती

सही/-
**( श्रीमती.ए.एन.सरक )**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी
न्यायालय क्र.३ नेवासा

दिनांक :०४/१०/२०२४

**शपथेवर सुरु**

**<u>पुन्हा उर्वरित उलटतपास आरोपीतर्फे ॲड पी.डी. गर्जे यांचे मार्फत सुरु-</u>**

आमच्या घराकडे येणारा रस्ता हा कच्चा रस्ता आहे. रस्त्याचे खडीकरण झालेले आहे. पोलीस पंचनाम्याला आले त्यावेळी मी गज पोलीसांना दिला होता. गजावर रक्ताचे डाग किंवा कसे हे मी सांगु शकत नाही.हे म्हणणे खरे नाही की, माझे वडील आमच्याकडे राहण्यास आहेत. हे म्हणणे खरे आहे की, वडीलोपार्जीत जमीन माझे व वडीलांच्या नावावर आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र १ च्या नावावर जमीन नाही. घटनेच्या वेळी माझा मेव्हणा तिथे नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, मी

माझा मेव्हणा व माझा नातेवाईक शेताच्या कारणावरुन आरोपींना त्रास देत असतो. साक्षीदार स्वता सांगतो की आरोपींच्या नावावर जमीन नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी व माझी पत्नी रत्यावर खाली पडलो त्यामुळे आम्हाला जखम झाली. हे म्हणणे खरे नाही की, मी गाडीवरुन पडलेल्या जखमा पोलीसांना दाखवुन आरोपीविंरुध्द खोटी फिर्याद दाखल केली. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. २ हिने मला शिवीगाळ केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. १ याने मला गजाने  अथवा लाथाबुक्यांनी मारहाण केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझया पत्नीलाही लाथाबुक्यांनी मारहाण केली नाही. हे म्हणने खरे नाही की, आरोपींनी मला जिवे मारण्याची धमकी दिलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, आमचे व आरोपींचे शेताचे व रस्त्याचे वाद आहे त्यामुळे मी आरोपीविरुध्द खोटी फिर्याद दाखल केली. हे म्हणणे खरे नाही की, अशी कोणतीही घटना घडलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण, फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृती

सही/-

**( श्रीमती.ए.एन.सरक )**

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी

न्यायालय क्र.३ नेवासा

दिनांक :०४/१०/२०२४